संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवा काळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# उत्तरप्रदेश दारुकांडाचे मोठे धागेदोरे

**उत्तर प्रदेशात** एकीकडे प्रयागला अभूतपूर्व असा कुंभमेळा भरला आहे. दुसरीकडे प्रियंका गांधी यांच्या लखनौमधल्या रोड शोने वातावरण तापवले असतानाच त्याच उत्तरप्रदेशमध्ये विषारी दारूमुळे शंभर जणांचे प्राण जावेत आणि त्याकडे दुर्लक्ष व्हावे हे दुर्दैव ठरते. उत्तरप्रदेश आणि उत्तराखंड या राज्यांच्या काही भागात विषारी दारूचे प्रकार घडला. सुरुवातीला सहारनपूर जिल्ह्यात चाळीस जणांचे बळी गेले तर उत्तराखंडच्या हरिद्वार जिल्ह्यात वीस जणांचा मृत्यू झाला असतानाच आझमगढ, हरदोई, कानपूर आणि बाराबंकी येथेसुध्दा विषारी दारूच्या घटना घडल्या होत्या. गेल्या काही दिवसात सलगपणे हा प्रकार होताना दिसतो. त्यामागे काही ना काही कारस्थान असू शकते. कदाचित तो घातपाताचाही प्रकार नाकारता येत नाही. कारण लागोपाठ घटना घडतात. आणि त्यात शंभरावर लोकांचे बळी जातात. ही काही साधारण घटना म्हणता येत नाही. कायदा सुव्यवस्थेचे ढोल बडवले जात असताना जर हे प्रकार घडत असतील तर कायदा धाब्यावर बसवणाऱ्यांना मोकळे रान मिळाले आहे असा त्याचा अर्थ निघतो. मुळातच उत्तर भारतातली अनेक राज्ये ही कायदा सुव्यवस्थेच्याबाबतीत अतिशय ढिसाळ आणि भोंगळ आहेत. त्याठिकाणी सातत्याने होणारे राजकीय आणि धार्मिक कार्यक्रम पोलिसांनाही सतत व्यस्त ठेवत असतात. लोकसंख्येच्यादृष्टीने ही राज्ये मोठी असल्याने त्याप्रमाणात पोलिसांचा किंवा एकूण सुरक्षा यंत्रणांचा पुरेसा फौजफाटा नाही. हेही अनेकवेळेला सिध्द झाले आहे. यातला गंभीर भाग असा की स्थानिक पोलिस पातळीवर तितक्याच मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार आणि राजकीय हस्तक्षेप होत असतात. पोलिस दल खूप निष्पक्षपणे काम करू शकत नाहीत याच परिस्थितीचा ते गैरफायदा घेतात आणि मग अशा प्रकारे अवैध धंदे करणाऱ्यांबरोबर त्यांचे हितसंबंध गुंतलेले असतात. या सगळ्या विषारी दारुकांडाचे धागेदोरेसुध्दा काही राजकीय नेत्यांपर्यंत जाऊन पोहचत असल्याचे समोर येत आहे. शिवाय पोलिस दलातील वरिष्ठ अधिकारी आणि अवैध दारुविक्री करणाऱ्या माफिया टोळ्यांशी असलेले संबंध हादेखील मोठा चर्चेचा विषय ठरतो. शंभर जणांचे बळी घेणाऱ्या या दारुकांडाचे राजकीय धागेदोरे मुळापासूनच शोधले पाहिजेत.

### दारुचे दुष्परिणाम

अवैध दारुविक्रीला सगळ्या देशातच बंदी घातली आहे. सरकारी परवाना घेऊन अधिकृतपणे दारूची दुकाने चालवली जातात परंतु या दारुच्या दुकानांमधली दारू सामान्य माणसाला परवडत नाही. म्हणून तो अशा गावठी दारुकडे वळतो. खरे तर दारुचे व्यसन हे समाजविघातक आहे त्याला सरकारी मान्यताच असता कामा नये. परंतु सरकारला दारुविक्रीच्या परवान्यांमधून आणि त्यावरच्या करांमधून बराच मोठा महसूल मिळतो. शिवाय दारुच्या दुकानांचे परवाने देताना देखील पैसे ओरबाडायला मिळतात. हे सगळे एका दारुचे वेगवेगळे दुष्परिणाम आहेत. हळुहळू किंवा टप्प्याटप्प्याने दारूबंदीची व्याप्ती वाढवली पाहिजे. वेळ पडली तरी आपल्या महसूलावर पाणी सोडून लाखो लोकांचे जीव वाचवले पाहिजेत. सध्या देशभर महात्मा गांधींचे नाव वापरून स्वच्छता अभियानाची दवंडी पिटली जात आहे. परंतु त्याच महात्मा गांधींनी दारुला विरोध केला होता. स्वच्छता अभियानच राबवायचे असेल तर समाजात ठाण मांडून बसलेल्या या व्यसनाच्या घाणीलाही नाहीसे केले पाहिजे. एकूणच सामाजिक आरोग्यासाठी दारुबंदीचा फार मोठा हातभार लागू शकतो आणि समाजमनाला अधिक स्वच्छ ठेवता येऊ शकते. परंतु स्वच्छता अभियानात दारुबंदीचा अंतर्भाव नाही. याचा अर्थ सरकारचीदेखील दारुबंदी करण्याची मानसिक तयारी नाही. गेल्या वीस पंचवीस वर्षात या विषारी दारूने किंवा गावठी दारूने किमान वीस पंचवीस हजार लोकांचे बळी घेतले असतील. याशिवाय अतिरेकी दारु व्यसनामुळे होणाऱ्या रोगांनी कित्येकांचे बळी घेतले आहेत. या सर्व गोष्टींचा एकत्रितपणे विचार करून सरकारने आपली सामाजिक जबाबदारी ओळखली पाहिजे. देशभरात कुठेना कुठे अशी दारुकांडे चालू असतात. पण त्याचा राष्ट्रीय पातळीवर गांभिर्याने विचार होत नाही म्हणजेच समाजाच्या या नुकसानीकडे किंवा मनुष्यहानीकडे राज्यकर्त्यांचे अक्षम्य दुर्लक्ष झाल्याचे सिध्द होते.

### कायदा तरीही गैरव्यवस्था

कुंभमेळ्यासारखा एक पवित्र उत्सव उत्तरप्रदेशात सुरु असताना ही घटना घडावी हे तर आणखीनच मोठे दुर्दैव ठरते. म्हणूनच जाणीवपूर्वक कोणीतरी हा प्रकार उत्तरप्रदेशात घडवून आणला असावा. कारण घातपात करणाऱ्या विघातक वृत्ती कोणत्याही टोकाला जाऊन समाजाचे नुकसान करू शकतात. महाराष्ट्रात अलिकडेच आठ जणांना अटक केली गेली. त्यांच्याकडून विषारी पाण्यातून मनुष्यहानी घडवण्याचा कट रचला जाणार होता. पाणी पुरवठा करणाऱ्या तलावांमध्ये किंवा जलवाहिन्यांमध्ये काही रसायन टाकून ते हा प्रकार करणार असल्याचे पोलिस तपासात निष्पन्न झाले. परंतु महाराष्ट्र दहशतवाद विरोधी पथकाच्या सावधानतेमुळे त्या आठही जणांना अटक झाली आणि एक मोठा घातपात टळला. कदाचित अशा मनोवृत्तीतूनच हा प्रकार केला गेलाअसल्याची शक्यता नाकारता येत नाही. या प्रकाराची उच्चपातळीवर चौकशी व्हायला हवी. अशा प्रकारची दारू पिणारा वर्ग हा आर्थिकदृष्ट्या कमकुवत असतो. त्यांच्यामागे कोणताही आधार नसतो आणि मग त्यांची ही प्राणहानी गांभिर्याने घेतली जात नाही. त्यांच्या कमकुवतपणाचा तितकाच गैरफायदा घेतला जातो. आणि मग बड्या धेंडांचा सहभाग असलेली ही गुन्हेगारी राजकीय प्रभावामुळे दाबली जातात. योगी आदित्यनाथ यांचा स्वच्छ कारभाराचा डांगोरा पिटला जात असेल तर त्यांनी दारुमाफियांशी राजकारण्यांची असलेली अभद्र युती तितक्याच शिताफीने शोधून काढावी आणि आपल्या कार्यक्षमतेचा परिचय द्यावा. कारण एकाचवेळी अनेकठिकाणी झालेला हा दारुकांडाचा प्रयोग तितकाच नियोजित असण्याची शक्यता आहे. कायदा आणि सुव्यवस्था असे म्हणण्यापेक्षा कायदा तरीही गैरव्यवस्था असे त्याचे वर्णन केले पाहिजे.